भारतातील राष्ट्रीय एकात्मता

प्रा. डॉ. उत्तम हुसनाजी मानवते
कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर ग्रामीण कॉलेज, हनेगाव
ता.देगलूर जि.नांदेड

प्रस्तावना :

राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यासाठी त्या-त्या राष्ट्रामध्ये भू-प्रदेश, वंश, भाषा, धर्म आणि संस्कृती एकच असणे आवश्यक मानल्या जात असे. परंतू आज असे दिसून येत आहे की, राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यासाठी भू-प्रदेश, भाषा, वंश, धर्म आणि संस्कृती मध्ये विविधता असून सुध्दा राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकते. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय? हे पाहण्याअगोदर राष्ट्र म्हणजे काय हे बघावे लागेल. कारण राष्ट्र आणि राज्य या दोन्ही संकल्पना बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरल्या जातात. परंतू हया संकल्पना वेगळया आहेत. राष्ट्र निर्माण होण्यासाठी वरील घटकामध्ये भावनिक एकता असावी लागते. तसेच आपण अन्य समाजापेक्षा वेगळे आहेत. याचीही जाणीव ठेवावी लागते.

(1) उद्दिष्टे :

1. भारताची राष्ट्रीय एकात्मता जाणून घेणे.
2. राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ समजून घेणे.
3. राष्ट्रीय एकात्मतेचे आधार शोधणे.
4. राष्ट्रीय एकात्मतेमधील अडथळे शोधने.

(2) अर्थ :

राष्ट्रीय एकात्मता ही आदर्श कल्पना आहे. ती पूर्णपणे निर्माण होऊ शकत नाही. आपला धर्म, भाषा व संस्कृती यांची जपणूक करुन ध्येय-धोरणामध्ये समजुतदारपणे तडजोड करता येते व अशा तडजोडीतून सर्वांची प्रगती साध्य करता येऊ शकते. प्रत्येक गावात आपल्या संस्कृतीचे संरक्षण करणे तिला टिकवून ठेवणे यामुळे राष्ट्रीय एकात्मता साध्य केली जाते. राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ समजून घेण्यासाठी काही विचारवंताच्या व्याख्या बघणे आवश्यक ठरते.

1) एल.पी.माथुर :

"ज्या समाजात प्रस्थापित संस्था व त्यांच्याशी संबंधीत असलेले हक्क व मुल्य यांचा सर्वसामान्यपणे स्वीकार केला जातो असा एकात्म समाज होय."

2) डॉ.ब्रिजमोहन :

राष्ट्रीय एकात्मता ही अशी एक मानसिक, सामाजिक प्रक्रिया आहे की, ज्यात सर्व प्रकारचे समुह आपापल्या संकुचित निष्ठा सोडून राष्ट्राने स्वीकारलेल्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी सहभागी होतात.

राष्ट्रीय एकात्मतेचा संबंध राष्ट्राच्या अनेक बाजूंशी येतो त्या बाजू म्हणजे, सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृकि या बाजूच्या विकासावरच राष्ट्रीय एकात्मतेची स्थीरता अवलंबून असते. आर्थिक विषमता, धार्मिक फुट,

पक्षांचे मतांचे राजकारण यामुळे राष्ट्रीय एकात्मता अडचणीत येत असते. धर्म आणि राजकारण एकत्रीत आल्यास राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येत असते.

भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करीत असताना, 1956 साली भाषेच्या आधारावर जी प्रांतरचना करण्यात आली. त्यावेळी भाषेचे हितसंबंध अडचणीत आल्याने जनता प्रक्षुब्ध झाली होती. याचाच गैरफायदा काही राजकीय पक्षांनी घेऊन आंदोलने आणि चळवळी करुन राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आणली होती.

1956 नंतर, 1962 चीन-भारत युध्द 1965 व 1971-72 मधील भारत-पाक युध्दाच्या वेळी भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून आली होती. शत्रू राष्ट्राने केलेल्या आक्रमणास परतवून लावण्यासाठी सर्व भारतीय जनता एकत्र आली होती.

राष्ट्रामध्ये सामाजिक एकता नसेल तर सांप्रदायिकता व फुटीरता जन्म घेते. म्हणून सर्व भेदभाव विसरुन एकत्र आल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता साधणे शक्य नाही.

(3) भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचे आधार :

राष्ट्रीय एकात्मतेची निर्मिती झाल्यानंतर ती एकात्मता खास करुन टिकवून ठेवावी लागते. राष्ट्रीय एकात्मतेची भावना जोपासण्यासाठी भारतीय घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेत राष्ट्रीय एकात्मता टिकून राहण्यासाठी काही खास तरतुदी करुन ठेवल्या आहेत. त्या तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

I) धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार :

भारतामध्ये राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना ही अतिशय संकुचित अशा प्रकारची आहे. भारतीय संविधानाने लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि सामाजिक न्याय ही तत्वे स्वीकारलेली आहेत. तसेच राज्यघटनेत धर्मनिरपेक्षता स्वीकारण्यात आल्यामुळे भारतातील अल्पसंख्याकांना सुरक्षित वाटते, यामुळे अल्पसंख्याक लोक राष्ट्राशी एकरुप राहिलेले दिसून येतात.

II) प्रशासकीय एकात्मता :

भारतामध्ये केंद्र सरकार आणि घटक राज्यामध्ये आर्थिक सहकार्य सुरक्षीत चालवण्यासाठी भारतीय राज्यघटनेत अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे अखिल भारतीय प्रशासकीय सेवांची निर्मिती केली आहे. म्हणजे गावापासून ते केंद्रापर्यंत सर्व प्रशासकीय विभाग एकमेकांशी जोडले गले आहेत. त्यामुळे एकात्मता निर्माण व्हायला मदत झाली आहे.

III) एकेरी न्यायव्यवस्था :

भारतीय घटनाकारांनी देशासाठी एकेरी न्यायव्यवस्था स्वीकारली आहे, त्यामुळे तालुका पातळीपासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत देश एकसंघ जोडला गेला आहे. सर्वासाठी सारखेच कायदे सर्व नागरीकांना एकच नागरिकत्व यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यास मदत होत आहे.

IV) संघराज्य शासन :

भारतीय घटनाकारांनी देशाची अखंडता आणि राष्ट्राची एकात्मता मजबुत करण्यासाठी संघराज्य पध्दती स्वीकारली आहे. राज्याची स्वायतत्ता कायम ठेवून एकात्म राष्ट्र निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारला जास्त अधिकार दिले आहेत. असे असले तरी सर्व राज्यांना आपली भाषा व संस्कृती जपण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली आहे.

V) समतेचा हक्क :

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरीकांना समतेचा हक्क दिला आहे. त्यामुळे धर्म, जात, लिंग या कुठल्याही आधारावर भेदभाव केला जाणार नाही. अशी हमी मिळाल्यामुळे समाजात एकजुट निर्माण झाली आहे. आरक्षणामुळे अनुसूचित जाती, जमातीला संरक्षण मिळाले आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता साध्य झाली आहे.

(4) भारतातील राष्ट्रीय एकात्मते समोरील अडथळे :

भारतामध्ये सांस्कृतिक विविधता, जातीभेद, धर्मभेद, वंशभेद, लिंगभेद, दहशतवाद, प्रदेशवाद असे अनेक भेद आहे. या सर्वांवर मातकरुन राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न होत असतो. भारताच्या राष्ट्रीय एकात्मते समोर खालील अडथळे दिसून येतात.

I) जमातवाद :

हा सर्वांत मोठा असा गंभीर प्रश्न आहे. जमातवादाचा जन्म संकुचित धर्म अभिमानातून निर्माण होत असतो. जेव्हा आपल्या धर्माचा अभिमान बाळगत असताना दुसऱ्या धर्मास कमी लेखण्याची प्रक्रिया सुरु होते तेव्हा त्या जमातवादास अतिरेकी जमातवाद म्हणता येईल. अशा प्रकारच्या जमातवादाची सुरुवात इंग्रजांनी भारतात आणली आणि आज त्याचे एका मोठया वृक्षात रुपांतर झाले आहे आणि तो भारतातील एकात्मतेला आव्हान देत आहे.

II) प्रदेशवाद :

हा सुध्दा एक मोठा अडथळा निर्माण झालेला आहे. 1956 साली राज्यपुनर्रचना आयोगामुळे अनेक राज्यांची भाषेच्या आधारावर निर्मिती करण्यात आली, परंतू यामुळे राज्या-राज्यामध्ये दुरावा निर्माण होत आहे. त्यांच्या मते, भाषेच्या आधारावर सिमा, नदयांच्या पाण्यावरुन, वीज, सार्वजनिक उद्योग यावरुन सारखे संघर्ष होताना दिसतात. यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्मितीमध्ये अडथळा निर्माण होत आहे.

III) धार्मिकता :

धार्मिकता सुध्दा राष्ट्रीय एकात्मते समोरील अडथळा ठरत आहे. यामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय या प्रश्नांना सुध्दा धार्मिक रंग दिला जातो. आपल्या धर्म बांधवांच्या धार्मिक भावनेला हात घातला जातो आणि त्याचा फायदा राजकारणासाठी केला जातो. काही वेळेस तर धर्माच्या आधारावर प्रचार, दंगल, धार्मिक द्वेष यांचा उपयोग केला जातो. एक-एक जाती सुध्दा धर्माचा आधार घेऊन राजकारण करतात आणि धार्मिक तणाव वाढवतात त्यातून संघर्ष होतात, म्हणून धार्मिकता हा सुध्दा राष्ट्रीय एकात्मते समोरील अडथळा ठरत आहे.

IV) भाषावाद :

भाषावाद हा सुध्दा आज एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. भारतात अनेक भाषा आहेत. त्या त्या राज्याच्या वेगळया भाषा बोलल्या जातात. इंग्रज इथून गेल्यानंतर हिंदी भाषेचा स्वीकार सर्व राज्यांनी करावा असे ठरविण्यात आला. परंत दक्षिणेकडील राज्यानी त्यास विरोध केल्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला आहे. भाषेच्या आधारावर दंगली सुध्दा घडून येतात. हा राष्ट्रीय एकात्मतेत हा सुध्दा मोठा अडथळा ठरत आहे.

V) आर्थिक विषमता, दारिद्रय :

भारतात राज्यघटनेनुसार आर्थिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. परंतू ती लवकर निर्माण होऊ शकत नाही. आजसुध्दा निम्यापेक्षा जास्त जनता भारतात दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. त्यांना अन्न, वस्त्र आणि निवारा सुध्दा व्यवस्थीत मिळत नाही. भूमीहिन, शेतमजूर, आदिवासी, बोरी आणि झोपडपटयांचे अनेक प्रश्न आ-वासून उभे आहेत. यामुळे भारतात गरीब-श्रीमंत, भांडवलदार, कामगार, जमीनदार, शेतकरी यांच्या मध्ये मोठया

प्रमाणात संघर्ष होत आहेत. जनतेसोबतच राज्या-राज्यामध्ये सुध्दा आर्थिक विषमता आहे. त्यांच्यात सुध्दा संघर्ष होतात म्हणून हा सुध्दा राष्ट्रीय एकात्मतेसाठी अडथळा ठरत आहे.

VI) स्वार्थी राजकारण :

भारतातील राजकारणी सुध्दा सत्ता प्राप्त करण्यासाठी अनैतिक मार्गाचा वापर करतात. गुंडाना हाताशी धरुन संघर्ष घडवून आणले जातात. लोकांच्या अज्ञानाचा, गरीबीचा गैरफायदा घेतला जातो. जनतेत जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश या आधारावर भांडणे लावली जातात आणि राजकारण केले जाते.

VII) शिक्षण पध्दतीतील दोष :

शिक्षण पध्दतीतील अनेक दोषामुळे अनेक समस्या वाढल्या आहेत. त्यामध्ये बेकारी वाढली. व्यवसाय शिक्षणाचा अभाव, विद्यार्थ्यांना सुध्दा जात, धर्म, प्रदेश या विषयी चिथावणी केली जाते. त्यामुळे राष्ट्रीय चारित्र्य निर्मिती होत नाही. साक्षरता स्त्रीयांचे शिक्षण कमी असते. अंधश्रध्दा, पूर्वग्रह, संकुचित रुढी, वाईट चालीरिती या अनेक गोष्टीमुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

सारांश :

भारतामध्ये विविधतेच्या बाबतीत जर विचार केला तर असे वाटते की, भारत हा एक उपखंड आहे. भारतात मोठया प्रमाणात विविधता आहे. ती कन्याकुमारी ते हिमालयापर्यंत पसरलेली आहे. दुसऱ्या बाजूने विचार केला तर या विविधतेमध्ये एकता सुध्दा मोठया प्रमाणात आढळून येते. ही एकता भावनिक एकतेच्या आधारावर आहे. हाच भारतीय संस्कृतीचा प्राचीन वारसा आहे. त्यामुळे भारतात धार्मिक, जातीय, आर्थिक, सांस्कृतिक, भाषा, गरीबी असे अनेक प्रश्न असले तरी मोठया प्रमाणात राष्ट्रीय एकात्मता घडून आली आहे.

संदर्भ :

1. कविता सिंह, भारत मे सामाजिक समस्यांए, इरिका पब्लिशिंग हाऊस, जयपूर 2010
2. प्रदिप आगलावे, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर
3. डोळे, ना.य., भारतीय संविधान
4. भोळे, भा.ल., भारतीय राज्यघटना
5. मुखर्जी, रविंद्रनाथ, सामाजिक विचारधारा.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com